# नियमित दिवाणी दावा क्र.१३/२००८ मधील
# निशाणी क्र.५४ वरील आदेश

वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी अर्ज दाखल केलेला आहे. त्यावर प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी निशाणी क्र.५६ वरती म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे. वादी, प्रतिवादी यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. वादी व प्रतिवादींच्या कथनांवरुन खालील वादप्रश्नांचे उत्तर कारणांसह देत आहे.

| **अ.क्र** | **वादप्रश्न** | **उत्तर** |
|---|---|---|
| १. | वादीने दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी योग्य व संयुक्तीक कारण दिले आहे काय ? | ..होकारार्थी |
| २. | नियोजीत दुरुस्ती ही दाव्याचा अंतिम निकाल करण्याकरीता मदत करणारी आहे काय ? | ..होकारार्थी |
| ३. | काय आदेश ? | ..अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ ते ३ करीता** –

**३**. वादीचे अर्जामध्ये कथन की, वादीने दावा मिळकतीचे हद्दीखुणा कायम होवून मिळण्यासाठी दावा केला आहे. त्यामध्ये कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होवून अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी दावा कलम १–क व १–इ मध्ये २० आर क्षेत्राचे अतिक्रमण केलेले आहे. ते नकाशात गुलाबी रंगाने दाखविलेले आहे. ते दाव्यामध्ये काढून मागणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे दावा कलम ४ नंतर ४–अ, दावा कलम ७ मध्ये कॉलम नं–अ नंतर १–अ, दावा कलम ७ मध्ये १–अ नंतर २–अ नमूद करण्यास परवानगी मिळावी व दुरुस्ती मंजूर करावी अशी मागणी केलेली आहे.

४. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी निशाणी क्र.५६ वरती म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे. या प्रतिवादींचे कथन की, वादीने अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती आणि मोजणीमधील दुरुस्ती यामध्ये विसंगती आहे. दावा कलम १–ड, व १–इ या मिळकती एकत्र करुन वहिवाट करतो असे वादीचे कुठेही कथन नाही. वादीने मागितलेली दुरुस्ती ही कायदेशीर नाही. त्यामुळे ती नामंजूर करावी.

५. वादीचा दुरुस्ती अर्ज, प्रतिवादींचे त्यावरील म्हणणे, वादीचा मुळ दावा याचे अवलोकन केले असता, दाव्याच्या दरम्यान कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होवून अहवाल दाखल केलेला आहे. दाखल अहवालाचे अवलोकन केले असता त्यामध्ये अतिक्रमणाबाबत क्षेत्र दाखविलेले आहे. सबब, सदर दाव्यासाठी दुरुस्ती मागण्यासाठी वादीने योग्य व संयुक्तीक कारण दिलेले आहे. मुळ दाव्याचा अंतिम निकाल करण्यासाठी सदर दुरुस्ती आवश्यक आहे. त्यामुळे, या व वरील सर्व कारणास्तव मी वादप्रश्न क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी देत आहे व वादप्रश्न क्र.३ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | **आदेश** |
|---|---|
| १. | वादीचा निशाणी क्र.५४ वरील दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादी यास आदेश देण्यात येतो की, त्याने दावा दुरुस्ती व दावा दुरुस्ती प्रत सात दिवसात दाखल करण्याचे आहे. तसे न केल्यास अर्ज आपोआप रद्द समजण्यात येईल. |
| ३. | खर्चाबाबत वेगळा आदेश नाही. |

माळशिरस
दिनांक – १०/०१/२०१८

[एस.एस.इंदलकर]
दिवाणी न्यायाधीश व.स्तर
माळशिरस

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer : **S. S. Mitragotri**

(b) Court : **Civil Court Senior Division, Malshiras.**

(c) Order signed by P.O. on : **10.01.2018.**

(d) Order uploaded on : **23.01.2018.**